| MHPA100004632022 | मे.अ.नु.भ. अर्ज क्र. १७/२०२२<br>माउली पि. शंभुदेव घुगे व इतर ३ .. अर्जदार.<br>विरुध्द<br>जगतसिंग पि. लाभसिंग बिजैन व इतर ४ .. सामनेवाले. |
|---|---|

**निशाणी क्र. ५ वरील हुकूम**

१. प्रस्तुतचा अर्ज हा दिनांक ०४.१२.२०२१ रोजी झालेल्या मोटार वाहन अपघातात शंभुदेव सदाशिव घुगे यांच्या झालेल्या मृत्यू प्रकरणी मोटार वाहन कायदा कलम १४० नुसार अंतरिम नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदारांनी असे कथन केले आहे की, मयत शंभुदेव हे पोलीस मुख्यालय नांदेड येथे पोलीस नाईक या पदावर कार्य करीत होते. मृत्यूसमयी ते ३२ वर्षांचे होते. दिनांक ०४.१२.२०२१ रोजी सकाळी ८.३० वाजता मयत शंभुदेव हे त्यांचे वाहन मोटारसायकल क्र. एम.एच.—४५—एसी—८३४५ ने पालमकडून गंगाखेड येथे घरी येत होते. जेंव्हा ते वाहतुकीचे नियमांचे पालन करीत आर.के. मंगलकार्यालया जवळ पोहचले असतांना अचानक समोरून गंगाखेडकडून पालमकडे जात असलेली महिंद्रा झायलो कार नंबर एमएच—२६—एस—१८८२ च्या चालक व मालक सामनेवाला क्र.१ याने रस्त्याचे परिस्थीतीचा विचार न करता हलगर्जी व निष्काळजीपणे अति वेगात चालविली व वाहन मोटारसायकल क्र. एम.एच.—४५—एसी—८३४५ ला जोरदार ठोस मारली व अपघात झाला. सदर अपघातात मोटारसायकल क्र. एम.एच.—४५—एसी—८३४५ चा चालक शंभुदेव सदाशिव घुगे यांना अनेक गंभीर जखमा झाल्या. त्यानंतर गंभीर जखमी शंभुदेव यांना ॲम्बुलन्सने उपजिल्हा रूग्णालय, गंगाखेड येथे दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्यांना तपासल्यानंतर त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषीत केले. त्यानंतर सदाशिव ग्यानबा घुगे यांनी गंगाखेड पोलीस ठाणे येथे महिंद्रा झायलो कार

नंबर एमएच—२६—एस—१८८२ च्या चालकाच्या विरूध्द फिर्याद दिली. सदर अपघात हा झायलो कारच्या चालकाच्या चुकीमुळे झाला आहे. सामनेवाला क्रमांक १ हे सदर वाहनाचे चालक आहेत. सामनेवाला क्रमांक २ हे सदर झायलो कारचे मालक आहेत. सदर वाहनाचा विमा सामनेवाला क्र.३ कडे उतरविण्यात आला होता.

३. सामनेवाला क्र.१ झायलो कार वाहनचालक यांनी मुळ अर्ज आणि अंतरिम नुकसान भरपाईच्या अर्जास जबाब दाखल केलेला असुन तो निशाणी क्र.१९ वर आहे. सामनेवाला क्र.१ यांनी अर्जातील कथने नाकारलेली आहेत. सामनेवाला हे असे कथन करतात की, सदर अपघातास वाहन मोटारसायकल क्र. एम.एच.—४५—एसी—८३४५ चा चालक मयत शंभुदेव हेच जबाबदार असून, झायलो कारच्या चालकाची काहीही चूक नसतानाही अर्जदार यांनी त्यांना सामनेवाला क्र.१ म्हणून विनाकारण सदर प्रकरणात गोवले आहे. झायलो कार नंबर एमएच—२६—एस—१८८२ चा चालकाकडे वाहन चालवण्याचा परवाना असून, सदर परवाना दि.२७.६.२०२७ पर्यंत वैध आहे. सदर वाहनाच्या विमा सामनेवाला क्र.२ यांनी सामनेवाला क्र.३ कडे उतरविण्यात आलेला असून, सदर विमा पॉलीशी ही दिनांक २६.०१.२०२१ ते २५.०१.२०२२ पर्यंत वैध आहे. त्यामुळे सामनेवाला क्र.१ हे नुकसान भरपाईची रक्कम देणे लागत नाही. सामनेवाला क्र.१ यांनी अर्जात नमुद केलेले मयताचे वय, धंदा व उत्पन्न नाकारलेले आहे.

४. सामनेवाला क्र.२ हे प्रकरणात हजर राहीले, परंतु ते त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यात अपयशी ठरले, म्हणून त्यांच्या विरुध्द प्रकरण विना लेखी जबाब आदेश करुन चालविण्यात आले.

५. नोटीस मिळूनही सामनेवाला क्र.३ विमा कंपनी तर्फे कैफियत नि. क्र.२५ ला दाखल करण्यात आलेली आहे. अर्जातील सर्व कथने सामनेवाला क्र.३ यांनी स्पष्टपणे नाकारलेली आहेत. अपघातामध्ये झायलो एमएच—२६—एस—१८८२ चा समावेश असल्याची बाब

सामनेवाला यांनी नाकारली आहे. अर्जात मागणी केलेली नुकसान भरपाईची रक्कम ही अवाजवी व अवास्तव आहे. त्यामुळे ती देण्यास सामनेवाला देण्यास जबाबदार नाही. झायलोवरील चालकाने विमा पॉलीशीच्या अटी व शर्तीचा भंग केलेला आहे. झायलो चालकाकडे वैद्य वाहन चालविण्याचा परवाना नव्हता. विमाधारकाने विहित मुददतीत सर्व कागदपत्रे व अपघाताची खबर ही विमा कंपनीला कायदयाप्रमाणे दिलेली नाही. त्यामुळे अपघाताबद! दल व त्यामधील वाहनाच्या समावेशाबद्दल शंका उपस्थित होते. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी मागणी सामनेवाला क्र.३ यांनी केलेली आहे.

६. सामनेवाला क्र. ४ व ५ यांनी मुळ अर्ज आणि अंतरिम नुकसान भरपाईच्या अर्जास जबाब दाखल केलेला असुन तो निशाणी क्र.२० वर आहे. सामनेवाला क्र.४ व ५ यांनी अर्जदाराच्या अर्जातील संपुर्ण कथने मान्य केलेली आहेत. सामनेवाला हे असे कथन करतात की, सदर अर्जात त्यांना अर्जदार म्हणून समावेश करणे गरजेचे होते, परंतु तसे झाले नाही. सामनेवाला क्र.४ व ५ यांनी माहिती मिळताच सदर प्रकरणात हजर होवून आवश्यक पक्षकार करण्याची मागणी केल्यावरून त्यांचा या अर्जात सामनेवाला क्र.४ व ५ म्हणून समावेश करण्यात आला आहे. सामनेवाला क्र. ४ ही मयत शंभुदेव घुगे यांची मुलगी असून, गैरअर्जदार क्र.५ ही त्याची दुसरी पत्नी आहे. या दोघांकडे उत्पन्नाचे साधन नसून, ते दोघेही मयत शंभुदेव यांच्या उत्पन्नावर अवलंबून होते. त्याअनुषंगाने ते दोघेही मयताचे कायदेशिर वारस आहेत. सदर कथनाच्या पुष्ठ्यर्थ त्यांनी यादी नि.क्र.१५ अंतर्गत वारसा प्रमाणपत्र दाखल केले आहे. म्हणून अर्ज नि.क्र.५ मंजूर करताना त्यांच्या हिशाची नुकसान भरपाई त्यांना देण्यात यावी.

७. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद व्ही.सी. वर ऐकला. तसेच कागदपत्रांची पाहणी केली. अभिलेखावरील पोलीस पेपर, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, पोस्टमॉर्टेम नोटस, गाडीचे आर.सी. बुक, विमा पॉलीसी यावरुन असे दिसुन येते की, दिनांक ०४.१२.२०२१ रोजी संध्याकाळी

८.३० वाजता झालेल्या मोटार वाहन अपघातात मयत शंभुदेव सदाशिव घुगे यांचा फिर्यादीमध्ये नमुद करण्यात आलेल्या महिंद्रा झायलो कार बरोबर झालेल्या अपघातातील झालेल्या जखमांमुळे मृत्यू झाला आहे. युक्तिवादा दरम्यान अर्जदार यांच्या वतीने सामनेवाली क्र.५ ही मयताची दुसरी पत्नी आहे व सामनेवाली क्र.४ ही मयताची मुलगी आहे. त्यामुळे त्यांना नुकसान भरपाईच्या रक्कमेत हिस्सा देण्यास अर्जदारांची हरकत नाही असा युक्तिवाद करण्यात आला. श्रीमती जमीन फातीमा मयत पती रियाज अहेमद व इतर विरूध्द द नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड एमएफए नं.११०७०/२००६ (एमव्ही) कर्नाटका हायकोर्ट, यांनी दिलेल्या वरील निवाडयात जर दुसरी पत्नी ही मयतावरती अवलंबून असल्यास तिला नुकसान भरपाई मागण्याचा अधिकार आहे असा निवाडा दिला आहे. त्यामुळे अर्जदारांच्या वतीने केलेले निवेदन जबाब नि.२० मधील कथन यांचा विचार करता अर्जदार यांच्या बरोबरीने सामनेवाली क्र.४ व ५ यांना अंतरिम नुकसान भरपाईच्या रक्कमेत समान हिस्सा मिळण्यास पात्र आहेत हे स्पष्ट होते.

८. अर्जदार यांनी अर्जाच्या पृष्ठयर्थ नि.क्र.४ सोबत पोलीस पेपर, फिर्याद, घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा, पोस्टमॉर्टेम नोटस, गाडीचे आर. सी. बुक, विमा पॉलीसी, वाहन चालविण्याचा परवाना, एए फॉर्म, फिटनेस प्रमाणपत्र इ. कागदपत्रे दाखल केले आहेत.

९. मोटार वाहन कायदा कलम १९८८ चे उपकलम २ कलम १४० नुसार मृत्यू झाल्यास अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम ही रूपये ५०,०००/— अशी ठरविलेली आहे. तसेच कलम १४० चे उपकलम ३ नुसार अर्जदार यांना सदरहु अपघात हा कोणाच्या चुकीच्या कृतीमुळे, निष्काळजीपणामुळे व वाहन चालकाच्या कमतरतेमुळे झाला याबद्दल कथन करून ते शाबीत करण्याची जबाबदारी नाही. यादी नि.क्र.१५ अंतर्गत वारसा प्रमाणपत्राचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत शंभुदेव घुगे यांचे कायदेशिर वारस म्हणून अर्जदार क्र.१ ते ४ व सामनेवाला

क्र.४ यांना दर्शविण्यात आले आहेत. वरील सर्व बाबींचा तसेच या केस मधील घटनांचा मोटार वाहन कायदा कलम १९८८ चे कलम १४० प्रमाणे विचार करता मी या मतास आलो आहे की, अर्जदार क्र.१ ते ४ व सामनेवाला क्र.४ शरयु पि. शंभुदेव घुगे यांना वरील अर्जात नमुद केलेल्या अपघातात शंभुदेव पि. माणिकराव धोंगडे यांच्या मृत्यू प्रकरणी अंतरिम नुकसान भरपाई रक्कम रूपये ५०,०००/— मिळण्यास पात्र आहेत. सबब, मी खालील आदेश निर्गमित करतो.

## आदेश

१. अर्ज निशाणी क्र.५ मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाले क्र. १ ते ३ यांनी संयुक्तिरित्या व वैयक्तिकरित्या अंतरिम नुकसान भरपाई पोटी रक्कम रूपये ५०,०००/— (अक्षरी रूपये पन्नास हजार मात्र) ही अर्जदार क्र. १ ते ४ तसेच सामनेवाला क्र.४ व ५ शरयु पि. शंभुदेव घुगे व वैशाली शंभुदेव घुगे यांना दयावी. सदर रक्कम आजपासुन एक महिन्याचे आत सामनेवाला यांनी अदा करावी. सामनेवाला यांनी भरलेली वरील अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम ही अर्जदार क्र. १ ते ४ तसेच सामनेवाला क्र.४ व ५ यांना समसमान अदा करण्यात यावी.

३. सामनेवाला यांनी वरील अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम वरील नमुद केलेल्या कालावधीत न भरल्यास आदेशाचे तारखेपासुन ते रक्कम पुर्ण वसुल होईपर्यंत त्यावर वार्षिक ६ टक्केप्रमाणे व्याज मिळण्यास अर्जदार पात्र राहतील.

४. वरील अंतरिम नुकसान भरपाईची रक्कम भरल्यानंतर ती अर्जदार व सामनेवाला क्र.४ यांना एन.ई.एफ.टी.द्वारे त्यांच्या बॅंक खात्यात अदा करण्यात यावी.

Digitally signed by DINESH DATTATRAYA KURULKAR
Date: 2023.09.29 17:14:37 +0530

**( डी. डी. कुरूलकर )**
सदस्य,
दि.२०.०९.२०२३. मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
गंगाखेड, जि.परभणी.